प्रादेशिक अधिकारी, मऔविम, चंद्रपूर कार्यालय कार्यान्वित करणेसाठी आवश्यकती अनुषंगीक कार्यवाही करणेबाबत.

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
"उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र,
अंधेरी (पूर्व), मुंबई- ९३
दुरध्वनी क्रमांक -०२२-४७४८८३१२ / ४७४८४६९९ / ४७४८४६७९
email-adminofficer@midcindia.org

क्र.मऔविम/ साप्रवि/प्रा.अ. चंद्रपूर / P310412 /२०२४, दिनांक:- 06 SEP 2024

**कार्यालयीन आदेश :-**

महामंडळाचा कार्यालयीन आदेश क्र. पी-२९४८९३, दिनांक १३/०८/२०२४ अन्वये नव्याने मान्यता देण्यात आलेली ७ प्रादेशिक कार्यालये कार्यान्वित करणेसाठी आवश्यकती अनुषंगीक कार्यवाही करणेबाबतचा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने प्रादेशिक कार्यालय, मऔविम, चंद्रपूर हे कार्यालय कार्यान्वित करणेबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) प्रादेशिक कार्यालय, मऔविम, नागपूर तसेच प्रादेशिक कार्यालय, मऔविम चंद्रपूर या कार्यालयाचे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे राहील.

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | कार्यालयाची कार्यकक्षा |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक कार्यालय, नागपूर | नागपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे, तसेच सदर जिल्ह्यातील सर्व भूसंपादनाची कामे |
| २ | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर | चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा या जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे, तसेच सदर जिल्ह्यातील सर्व भूसंपादनाची कामे |

तसेच महामंडळाचे दिनांक १३/०८/२०२४ रोजीचे कार्यालयीन आदेशाचे अनुषंगाने या आदेशाचे दिनांकापासून प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, नागपूर यांनी नागपूर, भंडारा व गोंदिया या जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रांचे कामकाज पहावे आणि प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, चंद्रपूर यांनी चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा या जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रांचे कामकाज पहावे.

२) प्रादेशिक कार्यालय, मऔविम, नागपूर अंतर्गत क्षेत्र व्यवस्थापक कार्यालय, चंद्रपूर हे कार्यालय या आदेशाचे दिनांकापासून रद्द करण्यात येऊन सदरचे कार्यालय हे प्रादेशिक कार्यालय, मऔविम, चंद्रपूर असे संबोधित करण्यात यावे.

३) क्षेत्र व्यवस्थापक कार्यालय, मऔविम, चंद्रपूर येथे खालील नमूद कार्यरत अधिकारी/ कर्मचारी हे या आदेशाचे दिनांकापासून प्रादेशिक कार्यालय, मऔविम, चंद्रपूर या कार्यालयात कार्यरत राहतील.

| अ.क्र. | कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| १ | श्री. जी. एल. दहाघणे, क्षेत्र व्यवस्थापक |

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| अ.क्र. | कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| २ | श्री.गोपाळ रमेश लोणकर, भूमापक |
| ३ | श्रीमती पल्लवी बेल्हेकर, लिपिक-टंकलेखक |

उपरोक्त नमूद अधिकारी / कर्मचारी यांचे व्यतिरिक्त मूळ प्रादेशिक कार्यालय, नागपूर व अधिनस्त क्षेत्र व्यवस्थापक कार्यालयात कार्यरत इतर सर्व अधिकारी / कर्मचारी हे प्रादेशिक कार्यालय, मऔविम, नागपूर येथेच कार्यरत राहतील.

४) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, नागपूर यांनी चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा या जिल्ह्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रांशी सबंधीत सर्व नस्ती व इतर सर्व प्रकारची कागदपत्रे प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, चंद्रपूर यांचेकडे हस्तांतर करावेत.

५) प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर हे कार्यालय या आदेशाच्या दिनांकापासून प्रादेशिक कार्यालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत होईल याबाबतची सर्व जबाबदारी संबधित प्रादेशिक अधिकारी तसेच मुख्य अभियंता, नागपूर यांची राहील.

६) महामंडळाच्या दिनांक १३/०८/२०२४ चे कार्यालयीन आदेशान्वये आवश्यक ती अनुषंगीक कार्यवाही करणेबाबत देण्यात आलेल्या सूचना कायम राहतील.

सदर आदेश मा. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), मऔविम यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(तुषार मठकर)
**महाव्यवस्थापक (मबवि)**
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई.
- मा. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन/विदर्भ), मऔविम, मुंबई.

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता :-**

- सर्व विभाग प्रमुख / कार्यालयीन प्रमुख, मऔविम.
- मुख्य अभियंता, मऔविम, नागपूर.
- प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, नागपूर.
- प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, चंद्रपूर.
- सुरक्षित नस्ती/कार्यालयीन आदेश नस्ती/वैयक्तीक नस्ती.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in